आरबीआय/२०१२-१३/८३

डीसीएम (एनई) क्र.जी-१/०८.०७.१८/२०१२-१३ जुलै ०२, २०१२

**सर्व बँकांचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक/मुख्य कार्यकारी अधिकारी**

महोदय/महोदया,

**महापरिपत्रक - नोटा व नाणी बदलून देण्याची सुविधा**

कृपया नोटा व नाणी बदलून देण्याच्या सुविधेच्या महापरिपत्रक डीसीएम (एनई) क्र.जी-१/०८.०७.१८/२०११-१२ दिनांक ०१ जुलै, २०११ महापरिपत्रकाचा संदर्भ घ्यावा. आपल्या माहितीसाठी व योग्य तेथे आवश्यक ती कृती करण्यात मदत व्हावी म्हणून आम्ही या परित्रकाची या विषयावरील अद्यावत एक प्रत आमच्या www.rbi.org.in ह्या वेबसाईटवर टाकली आहे.

आपला

सही/-

(बी.पी.विजयेन्द्र)

मुख्य महाव्यवस्थापक

सहपत्र :- वरील प्रमाणे

**जोडपत्र**

**महापरिपत्रक - नोटा व नाणी बदलून देण्याची सुविधा दिनांकित २ जुलै, २०१२**

**१. बँकांच्या शाखांमध्ये नोटा व नाणी बदलून देण्याची सुविधा.**

**(अ)** देशाच्या सर्व भागांमधील सर्व शाखांनी जनतेला पुढील ग्राहक सेवा अधिक त्वरेने उत्साहाने देऊ कराव्यात. त्यामुळे जनतेला केवळ ह्या कारणासाठीच रिझर्व बँकेकडे आवश्यकता पडणार नाही.

**(१)** सर्व मूल्यांच्या चांगल्या/नव्या नोटा व नाण्यांबाबतची मागणी पूर्ण करणे
**(२)** मळलेल्या नोटा बदलून देणे आणि
**(३)** व्यवहार किंवा बदलून देण्यासाठी नाणी व नोटा स्वीकारणे.

(ब) सर्व डेसिग्नेटेड बँक शाखांनी मळक्या/खराब नोटा बदलून देण्याची सुविधा द्यावी. सध्या ह्यासाठी, कंरसी चेस्ट शाखा ह्याच डेसिग्नेटेड शाखा आहेत. अशा शाखांनी, कामकाजांच्या सर्व दिवशी, कोणताही भेदभाव न करता, मागणी केल्यास, मळक्या नोटा बदलून त्यांच्या जागी नव्या नोटा/नाणी देण्याची सुविधा जनतेला द्यावी. ह्याशिवाय, काही निवडक करंसी चेस्ट शाखांद्वारे महिन्यातील एका रविवारीही अशी बदलून देण्याची सुविधा अबाधित राहील. अशा बँक शाखांची नावे व पत्ते संबंधित बँकांकडे उपलब्ध असावेत.

(क) जास्तीत जास्त लोकांच्या माहितीसाठी, वरील सुविधा बँकेत उपलब्ध असल्याबाबत मोठी प्रसिध्दी दिली जावी.

**(ड)** काउंटरवर ग्राहकांनी दिलेल्या कमी मूल्याच्या नोटा/नाणी ह्यांचा स्वीकार करण्यास कोणत्याही बँक शाखेने/कर्मचाऱ्याने नकार देऊ नये.

**२. भारतीय रिझर्व बँक नोटांचा परतावा नियम, २००९, संपूर्ण अधिकार देणे.**

**(अ)** भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ च्या कलम २८ सहवाचित कलम ५८(२) अन्वये, भारत सरकार किंवा आरबीआय ह्यांच्याकडून, कोणत्याही व्यक्तीला, हरविलेल्या, चोरी झालेल्या फाट्क्या किंवा असंपूर्ण असलेल्या चलनी किंवा जीओआयच्या नोटेचे किंवा बँकनोटेचे मूल्य परत मिळविण्याचा अधिकार नाही तथापि, खऱ्या बाबींबाबत जनतेचा त्रास/अडचण कमी करण्यासाठी तरतुद करण्यात आली आहे की, केंद्र सरकारच्या पूर्वमंजुरीने, रिझर्व बँक, सद्भावना म्हणून, अशा चलनी किंवा बँक नोटांचे मूल्य परत करण्याबाबतची परिस्थिती, अटी व मर्यादा विहित करु शकते.

**(ब)** जनतेच्या सोयीसाठी व फायद्यासाठी अशी सुविधा देण्याच्या विचाराने, बँकांच्या नेमलेल्या शाखांना, भारतीय रिझर्व बँक (नोटांचा परतावा) नियम, २००९ खाली, फाटक्या/खराब झालेल्या/सदोष नोटा, निःशुल्क बदलून देण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. सध्यातरी ह्यासाठी करन्सी चेस्ट शाखा 'डेसिग्नेटेड ब्रँचेस' आहेत.

**३. मळक्या नोटांची उदारीकृत व्याख्या**

अदलाबदलीची सुविधा सुलभपणे व्हावी ह्यासाठी, मळक्या नोटेची व्याख्या अधिक विस्तृत करण्यात आली. मळकी नोट म्हणजे, नेहमीच्या वापरामुळे खराब झालेली नोट आणि कोणतीही महत्वाची लक्षणे गायब न झालेल्या व एकाच नोटेचे दोन तुकडे एकत्रित जोडलेल्या नोटेचाही त्यात समावेश केला गेला आहे. अशा नोटा सरकारी भरणा करतेवेळी आणि जनतेच्या बँकेतील खात्यात जमा करण्यासाठी बँकांच्या काऊंटरवर स्वीकारल्या जाव्यात. तथापि अशा नोटा, पुनःप्रसारणासाठी जनतेला दिल्या जाऊ नयेत, तर आरबीआयच्या कार्यालयांद्वारे पुढील प्रक्रिया करण्यास आरबीआयकडे पाठविण्यासाठी करंसी चेस्टमध्ये ठेवल्या जाव्यात.

**४. फाटक्या नोटा - सादरीकरण व पास करणे.**

फाटकी नोट म्हणजे जिचा एखादा भाग गायब झाला आहे किंवा तिचे दोनपेक्षा अधिक तुकडे झाले आहेत अशी नोट. अशी फाटकी नोट वाणिज्य बँकांच्या नेमलेल्या शाखांमध्ये सादर करता येऊ शकते. भारतीय रिझर्व बँक (नोटांचा परतावा) नियम, २००९ खाली केलेल्या नियमांनुसार सादर केलेल्या फाटक्या नोटांचा स्वीकार, अदलाबदल किंवा निर्णय निर्णय केला जाईल.

**५. अत्यंत ठिसुळ, जळक्या, चिकटलेल्या नोटा**

अत्यंत ठिसुळ झालेल्या, जळलेल्या, जळके डाग असलेल्या किंवा एकमेकींना घट्ट चिटकलेल्या, सुट्या न करता येण्याजोग्या व नेहमीची हाताळणी करणे अशक्य असलेल्या नोटा बदलून देण्यासाठी शाखाद्वारे स्वीकारल्या जाणार नाहीत. त्याऐवजी त्यांच्या धारकांना त्या नोटा संबंधित इश्यु ऑफिसेसमध्ये सादर करावयास सांगितले जावे. तेथे एका खास कार्यरीतीखाली त्याबाबत निर्णय घेतला जाईल.

**६. 'पे'/'पेड' 'रिजेक्ट' शिक्के असलेल्या नोटा**

**(अ)**शाखेमधील प्रभारी असलेला प्रत्येक अधिकारी, म्हणजे शाखा व्यवस्थापक आणि लेखा विभागाचा किंवा रोख कक्षाचा प्रत्येक प्रभारी अधिकारी, भारतीय रिझर्व बँक (नोटांचा परतावा) नियम, २००९ खाली बदलून देण्यासाठी शाखेत आलेल्या नोटाबाबतचा निर्णय घेण्याबाबत 'विहित अधिकारी' म्हणून कार्य करेल. खराब झालेल्या नोटांबाबतचा निर्णय घेतल्यानंतर, विहित अधिकाऱ्यानेही, दिनांकित केलेल्या 'पे'/'पेड' 'रिजेक्ट' शिक्क्यांजवळ स्वतःची स्वाक्षरी करुन त्याचा आदेश नोंद करणे आवश्यक आहे. 'पे'/'पेड' 'रिजेक्ट' शिक्क्यांजवळ त्या बँकेचे व संबंधित शाखेचे नाव असणे आवश्यक असून, ह्या शिक्क्यांचा गैर वापर टाळण्यासाठी, ते "विहित अधिकाऱ्याच्या ताब्यात ठेवण्यात यावेत.

**(ब)**आरबीआयच्या कोणत्याही कार्यालयाचा किंवा कोणत्याही बँक शाखेचा 'पे'/'पेड' 'रिजेक्ट' शिक्का असलेल्या दोषयुक्त नोटा, कोणत्याही नेमलेल्या बँक शाखेत प्रदानासाठी पुनश्च सादर केल्या गेल्यास भारतीय रिझर्व बँक (नोटा परतावा) नियम, २००९ च्या नियम ६(२) खाली त्या नोटा फेटाळल्या जाव्यात आणि त्यांचा भरणा करणाराला सांगण्यात यावे की त्या नोटांचे मूल्य दिले जाऊ शकणार नाही कारण, त्यावरील पे/पेड शिक्क्यावरुन स्पष्ट होते की त्यांचे मूल्य आधीच दिले गेले आहे. सर्व बँकांच्या शाखांना सांगण्यात आले आहे की त्यांनी पे/पेड शिक्का असलेल्या नोटा जनतेला नजरचुकीने देऊ नये. शाखांनी त्यांच्या ग्राहकांनाही सांगावे की त्यांनी कोणत्याही बँकेकडून किंवा अन्य कोणाकडूनही अशा नोटा स्वीकारू नये.

**७. घोषणा/राजकीय संदेश इत्यादि लिहिलेल्या नोटा**

घोषणा किंवा राजकीय स्वरुपाचा संदेश लिहिली असलेली कोणतीही नोट ही वैध चलन समजली जाणार नाही व त्या नोटेबाबतचा दावा, भारतीय रिझर्व बँक (नोटांचा परतावा) नियम, २००९ च्या नियम ६(३)(३) खाली फेटाळला जाईल. त्याप्रमाणे विद्रुप केल्या गेलेल्या नोटाही वरील नियमाखाली फेटाळल्या जाऊ शकतात.

**८. जाणून बुजुन कापलेल्या नोटा**

मुद्दाम कापलेल्या/फाडलेल्या किंवा खराब केलेल्या नोटा त्यांच्या विनियम मूल्यासाठी सादर केल्या गेल्यास, त्या भारतीय रिझर्व बँक (नोटा परतावा) नियम, २००९ च्या नियम ६(३)(२) खाली फेटाळल्या जाव्यात. मुद्दाम कापल्या गेलेल्या नोटांची नेमकी व्याख्या करणे शक्य नसले तरी अशा नोटांकडे बारकाईने पाहिल्यास त्यामधील खोडसाळपणाचा हेतू स्पष्टपणे दिसून येईल, कारण अशा नोटा फाडण्याच्या रीतीमध्ये काही समानता/समानजागा, फाडून वेगळे टाकलेले भाग इत्यादि लक्षणे, विशेषतः नोटा मोठ्या संख्येने सादर करतेवेळी दिसून येतात. अशा प्रसंगी त्याबाबतचा तपशील म्हणजे, सादर करणाराचे नाव, सादर केलेल्या नोटांची संख्या, त्यांचे मूल्य, वगैरे, माहिती ती शाख़ा ज्याच्या अधिकारक्षेत्राखाली येते त्या इश्यु विभागाच्या उप/महाव्यवस्थापकाकडे सादर केली जावी, सादर केलेल्या अशा नोटांची संख्या मोठी असल्यास त्याबाबत स्थानिक पोलिसांनाही कळाविले जावे.

**९. प्रशिक्षण**

आमची इश्यु ऑफिसे, डेसिग्नेटेड बँक शाखांच्या 'विहित अधिकाऱ्यांसाठी' प्राधान्यतेने प्रशिक्षण - कार्यक्रम आयोजित करत असतात. खराब झालेल्या नोटांबाबतचा निर्णय घेण्याच्य प्रक्रियेत विहित अधिकाऱ्यांना ज्ञानप्राप्ति व आत्मविश्वास यावा ह्यासाठी हे प्रशिक्षण कार्यक्रम ठेवले जात असल्याने शाखांच्या विहित अधिकाऱ्यांना अशा कार्यक्रमांसाठी पाठविले जाणे अत्यावश्यक आहे.

**१०. नोटिस बोर्ड लावणे**

सर्व डेसिग्नेटेड बँक शाखांनी त्यांच्या शाखेमध्ये ठळक जागी 'येथे खराब/फाटक्या नोटा बदलून दिल्या जातात' असा बदलून देण्याच्या सुविधेबाबतचा फलक लावणे आवश्यक आहे. सर्व डेसिग्नेटेड बँक शाखांकडून नोटा व नाणी बदलून देण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे ह्याची बँकांनी खात्री करुन घ्यावी. खराब/फाटक्या नोटा बदलून देण्याचा व्यवसाय करणाऱ्या खाजगी व्यापाऱ्यांकडून ह्या सुविधेचा दुरुपयोग केला जाणार नाही ह्याची खात्री बँकांनी करुन घ्यावी.

**११. डेसिग्नेटेड शाखांमध्ये निर्णय घेण्यात आलेल्या नोटांची वासलात**

डेसिग्नेटेड बँकांनी निर्णय घेतलेल्या नोटांच्या ऑडिटच्या संबंधात, त्या शाखांनी संपूर्ण मूल्य दिलेल्या नोटा व त्यानंतर मळक्या नोटा, आधीच ठरविण्यात आलेल्या रितीने इश्यु ऑफिसकडे पाठवावयाच्या आहेत. अर्धे मूल्य दिल्या गेलेल्या नोटा व फेटाळण्यात आलेल्या नोटा, (ज्या डेसिग्नेटेड शाखेने तिच्या कॅश बॅलन्समध्ये ठेवल्या आहेत) वेगवेगळ्या गठ्ठयांमध्ये पॅक करुन संपूर्ण मूल्य दिलेल्या नोटांसह एकत्रित पाठविल्या जाव्यात किंवा पंजीकृत व विमाकृत पोस्टाने आवश्यकतेनुसार पाठविल्या जाव्यात. संपूर्ण मूल्य दिलेल्या नोटांना इश्यु ऑफिसद्वारे चेस्ट रेमिटन्स समजले जाईल तर अर्धे मूल्य दिलेल्या व फेटाळलेल्या नोटांना निर्णयासाठी सादर केलेल्या नोटा समजले जाईल व त्यावर योग्य ती प्रक्रिया केली जाईल. सर्व डेसिग्नेटेड शाखांनी, त्या महिन्यात निर्णय/निवाडा केलेल्या नोटांची संख्या दर्शविणारे मासिक विवरणपत्र आमच्या इश्यु ऑफिसला पाठविणे आवश्यक आहे.

**१२. आरबीआय व वाणिज्य बँकांमधील करार**

**अ)** बँक शाखांनी नोटांच्या बदल्यात नाणी स्वीकारावीत.

(ब) इंडियन कॉइनेज अधिनियम १९०६ अन्वये, त्यांनी वैध चलन असलेल्या सर्व नाण्यांचा जनतेकडून विनानिर्बंध स्वीकार करावा व त्यांचे मूल्य नोटांच्या स्वरुपात द्यावे.

**क)** ग्राहकांना मदत करण्यासाठी त्यांनी नोटा मोजणा-या यंत्रांचा उपयोग करावा किंवा मोठ्या स्वीकार्य रकमांसाठी नाणी वजनांवर स्वीकारावीत.

**१३. काढून टाकण्यात आलेली नाणी.**

**अ)** राजपत्रित अधिसूचना क्र २५२९ दि. डिसेंबर २०, २०१० अन्वये भारत सरकारने २५ पैसे व त्याखालील मूल्यांची नाणी व्यवहारातून काढून टाकण्याचे ठरविले आहे. त्यानुसार जून ३०, २०११ पासून ही नाणी वैध चलन असणार नाहीत.

भारतीय रिझर्व बँकेकडून पुढील सूचना मिळेपर्यंत अशी सर्व नाणि, ह्या बँकेच्या स्मॉल कॉईन्स डेपो (एससीडी) मध्ये ठेवली जावीत.

**ब)** ५० पैसे व एक रुपया मूल्यांची क्युप्रोनिकेलची नाणी काढून घेण्यात आली असून ती टाकसाळीत जमा करावयाची आहेत. ही नाणी, मूल्य-निहाय आणि धातु-निहाय अशी व प्रत्येक छोट्या पिशवीत १०० नाणी ह्या स्वरुपात ग्राहकांकडून स्वीकारली जावीत. त्याचप्रमाणे, ५० पैसे व रुपये-मूल्यांची प्रचलित/चालु नाणी स्वीकारण्यासाठीही अशीच व्यवस्था केली जावी.

**क)** व्यवहारात नसलेली/काढून टाकलेल्या नाण्यांचा साठा करण्याबाबतच्या अडचणी टाळण्यासाठी ५० पैसे व १ रुपयांची क्युप्रोनिकेलची नाणी, मुंबई/कोलकता/हैद्राबाद येथील भारत सरकारच्या टाकसाळीकडे, त्यांना पूर्वसूचना देऊन, संबंधित बँकेच्या डेसिग्नेटेड शाखे मार्फत (किंवा इतर बँकांच्या लिंक शाखांमार्फत) पाठविली जावीत. तथापि सध्याच्या कार्यरीतीनुसार, ५० पैसे, १ रु व २ रु आणि रु ५ ची स्टेनलेस स्टील/क्युप्रोनिकेलची नाणी पुनः व्यवहारात टाकली जावीत. रु २ ची क्युप्रोनिकेलची नाणी जनतेला न देता, ती पुढील सूचना मिळेपर्यंत डेसिग्नेटेड शाखांमध्येच ठेवली जावीत. मागणी नसल्याने अशा नाण्यांचा साठा बँकेच्या धारण क्षमतेपेक्षाही जास्त झाल्यास त्या नाण्यांच्या प्रेषणासाठी त्या मंडळाच्या इश्यु विभागाकडे जावे.

**१४. देखरेख व नियंत्रण**

**अ)** बँकांचे प्रादेशिक व्यवस्थापक/क्षेत्रीय व्यवस्थापक त्यांच्या शाखांना अचानक भेट देऊन त्यांची ह्याबाबत केलेल्या पालनासंबंधीची परिस्थिती त्यांच्या मुख्य कार्यालयाला कळवितील व ते कार्यालय अशा अहवालांचा आढावा घेऊन आवश्यक तेथे उपायात्मक कारवाई करेल.

**ब)** ह्याबाबतचे अनुपालन न केले गेल्यास ते भारतीय रिझर्व बँकेने दिलेल्या सूचनांचे उल्लंघन समजले जाईल.

**<u>महापरिपत्रक - नोटा व नाणी बदलून देण्याची सुविधा दिनांकित २ जुलै, २०१२</u>**

<u>महापरिपत्रकात एकत्रित केलेल्या परिपत्रकांची / अधिसुचनांची यादी</u>

| | | |
|---|---|---|
| डीसीएम (पीलजी). क्र. ६९८३/१०.०३.०३/२०१०-११ | २८.६.२०११ | २५ पैसे व त्याखालील मूल्याची प्रसारात असलेली सर्व नाणी परत मागवणे |
| डीसीएम (पीलजी). क्र. ६४७६/१०.०३.०३/२०१०-११ | ३१.५.२०११ | २५ पैसे व त्याखालील मूल्याची प्रसारात असलेली सर्व नाणी परत मागवणे - ही नाणी न स्वीकारली जाण्यासंबंधीच्या तक्रारी. |
| डीसीएम (पीलजी). क्र. ४४५९/१०.०३.०३/२०१०-११ | ०९.२.२०११ | २५ पैसे व त्याखालील मूल्याची प्रसारात असलेली सर्व नाणी परत मागवणे |
| डीसीएम (पीलजी). क्र. ४१३७/१०.०३.०३/२०१०-११ | २५.१.२०११ | २५ पैसे व त्याखालील मूल्याची प्रसारात असलेली सर्व नाणी परत मागवणे |
| गेजेट ऑफ इंडिया क्र.२५२९ | २०.१२.२०१० | २५ पैसे व त्याखालील नाणी काढून घेण्याबाबतची अधिसूचना |
| डीसीएम (आरएमएमटी)क्र.१२७७/ ११.३६.०३/२०१०-११ | २४.०८.२०१० | करन्सी चेस्ट शाखांद्वारे बदलून देण्याच्या सुविधा/सुविधा उपलब्ध करण्याची योजना |
| डीसीएम (एनई)क्र.१६१२/०८.०१.०१/२००९-१० | १३.०९.२००९ | नोट रिफंड (रुल्स), २००९ ची अधिसूचना |
| आरबीआय/२००६-०७/३४९/डीसीएम.(एनई)क्र. ७४८८/०८.०७.१८/ २००६-०७ | २५.०४.२००७ | छोट्या मूल्यांची नाणी व नोटांचा स्वीकार करणे |
| डीसीएम (आरएमएमटी)क्र.११८१/११.३७.०१/२००३-०४ | ०५.०४.२००४ | नाण्यांचा स्वीकार करणे |
| डीसीएम(एनई)क्र.३१०/ ०८.०७.१८/२००३-०४ | १९.०१.२००४ | नोटा, नाणी इत्यादि बदलून देण्यासाठी जनतेला सुविधा उपलब्ध करणे |
| डीसीएम(आरएमएमटी)क्र.४०४/ ११.३७.०१/२००३-०४ | ०९.१०.२००३ | नाण्यांच्या स्वीकार करणे व नोटांची उपलब्धता. |
| जी-११/०८.०७.१८/२००१-०२ | ०२.११.२००१ | भारतीय रिझर्व बँक (नोटा परतावा) नियम, १९७५ - सार्वजनिक/खाजगी क्षेत्रातील बँकांच्या करन्सी चेस्ट शाखांना नोटा बदलून देण्यासाठी सर्व अधिकार देणे. |
| सीवाय.क्र.३८६/०८.०७.१३/२०००-२००१ | १६.११.२००० | भारतीय रिझर्व बँक (नोटा परतावा) नियम, १९७५ - सार्वजनिक/खाजगी क्षेत्रातील बँकांच्या करन्सी चेस्ट शाखांना नोटा बदलून देण्यासाठी सर्व अधिकार देणे. |
| जी-६७/०८.०७.१८/९६-९७ | १८.२.१९९७ | आरबीआय (नोट परतावा) नियम, १९७५ - करंसी चेस्ट ठेवणाऱ्या खाजगी क्षेत्रातील बँकांना संपूर्ण अधिकार देणे. |
| जी-५२/०८.०७.१८/९६-९७ | ११.१.१९९७ | खराब नोटा देण्यासाठी पीएसबींना अधिकार देण्याबाबत आरबीआय (एनआर) नियम योजना पे/पेड स्टँप असलेल्या नोटांची वासलात. |
| जी-२४/०८.०१.०१/९६-९७ | ०३.१२.१९९६ | कापलेल्य नोटांच्या अदलाबदलीचा स्वीकार -उदारीकरण |
| जी-६४/०८.०७.१८/९५-९६ | १८.५.१९९६ | आरबीआय (एनआर) नियम - पीएसबींच्या शाखांना संपूर्ण अधिकार देणे व खराब नोटा बदलून देण्याबाबत प्रसिध्दी. |

| | | |
|---|---|---|
| जी-७१/०८.०७.१८/९२-९३ | २२.६.१९९३ | आरबीआय (एनआर) नियम - पीएसबींच्या शाख़ांना खराब नोटा बदलून देण्यासाठी संपूर्ण अधिकार देणे प्रसिध्द |
| जी-८३/सीएल-१(पीएसबी)-९१/९२ | ०६.५.१९९२ | आरबीआय (एनआर) नियम - पीएसबींच्या चेस्ट शाखांना अधिकार देणे |
| जी-७४/सीएल-(पीएसबी) (जीईएन)-९०/९१ | ०५.९.१९९१ | आरबीआय (एनआर) नियम - पीएसबींना ह्याखाली असलेले संपूर्ण अधिकार देणे . |
| ५.५/सीएल-१(पीएसबी)-९०/९१ | २५.९.१९९० | आरबीआय (एनआर) नियम - पीएसबीं ना संपूर्ण अधिकार देणे |
| ८/सीएल-१(पीएसबी)-९०/९१ | १७.८.१९९० | आरबीआय (एनआर) नियम - पीएसबींना संपूर्ण अधिकार देणे |
| जी-१२३/सीएल-१(पीएसबी) (जीईएन)-८९/९० | ०७.५.१९९० | आरबीआय (एनआर) नियम - पीएसबींना संपूर्ण अधिकार देणे (सुधारणा) |
| जी-१०८/सीएल-१(पीएसबी)(जीईएन)-८९/९० | ०३.४.१९९० | आरबीआय (एनआर) नियम १९८९-रु ५००/- मूल्याच्या बँक नोटा - पीएसबींच्या शाखांमध्ये खराबनोटा बदलून देणे. |
| जी-८/सीएल-१(पीएसबी)-८९/९० | १२.७.१९८९ | आरबीआय (एनआर) नियम -आरबीआयच्या इश्यु ऑफिसांद्वारे 'टु क्लेम्स' शिक्का असलेल्या खराब नोटा. |
| जी.८४/सीएल.१(पीएसबी)-८८/८९ | १७.३.१९८९ | आरबीआय (एनआर) नियम - पीएसबींना नोटा बदलून देण्यासाठी संपूर्ण अधिकार देणे |
| जी.६६/सीएल.१(पीएसबी)-८८/८९ | ०९.०२.१९८९ | आरबीआय (एनआर) नियम - पीएसबींना अधिकार देणे प्रशिक्षण |
| एस.१२/सीएल-१(पीएसबी)-८८/८९ | ३०.९.१९८८ | आरबीआय (एनआर) नियम - मुद्दाम खराब केलेल्या नोटा - निर्णय. |
| जी.१३४/सीएल-१(पीएसबी)-८७/८९ | २५.५.१९८८ | आरबीआय (एनआर) नियमाखाली, संपूर्ण अधिकार देण्यासाठीच्या योजनेची अंमलबजावणी |
| १९२/सीएल-१-(पीएसबी)-८६/८७ | ०२.६.१९८७ | आरबीआय (एनआर) नियम - पीएसबींना संपूर्ण अधिकार देण्याची योजना. |
| १८९/सीएल.२/८६/८७ | ०२.६.१९८७ | नोटांवर लिखाण करुन, संदेश लिहून, घोषणा लिहून चलनी नोटा खराब करणे |
| १८५/सीएल-१(पीएसबी)-८६/८७ | २०.५.१९८७ | आरबीआय (एनआर) नियम - खराब नोटांवर 'पे आणि रिजेक्ट' शिक्के मारणे. |
| १७३/सीएल.१/८४/८५ | ०२.४.१९८५ | खराब नोटा बदलून देण्यासाठी पीएसनींना संपूर्ण अधिकार देणे/त्याबाबतची कार्यरीत. |
| सीवाय.क्र.१०६४/सीएल.१/७६/७७ | ०९.८.१९७६ | मळक्या व थोड्या फाटलेल्या नोटा बदलून देण्यासाठी जनतेसाठी सुविधा |